सकाळ

## मिरा-भाईंदर पालिका ट्रॅफिक पार्कची निर्मिती करणार

# मुलांना वाहतुकीच्या नियमांचे उद्यानात धडे

भाईंदर, ता. १४ (बातमीदार) : शहरात वाढत्या वाहनांच्या गर्दीमध्ये वाहतुकीचे नियम पाळले जाणे, हे एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे. वाहतुकीचे नियम काय आहेत, वाहतुकीसंदर्भातील वेगवेगळ्या चिन्हांचा नेमका अर्थ काय आहे, याची माहिती देणारी स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध नाही. लहान मुलांना खेळता-खेळता हे नियम माहिती व्हावेत, यासाठी मिरा-भाईंदर महापालिका ट्रॅफिक पार्क उभारत आहे. राज्य सरकारने या प्रकल्पासाठी पाच कोटी रुपयांचा निधी दिला आहे.

मिरा रोड येथील कनाकिया भागात हे उद्यान निर्माण केले जाणार आहे.



ट्रॅफिक पार्कचे संकल्पचित्र.

रस्त्यावरील सिग्नल कसे काम करतात, रस्त्यावर झेब्रा क्रॉसिंगसह मारलेले विविध पट्ट्यांचा, तसेच बाणांचा अर्थ काय असतो, रस्त्याच्या बाजूला लावलेल्या फलकांवर लावण्यात आलेली गतिरोधक, प्रवेशबंदी, एकदिशा मार्ग, वळण आदी चिन्हे कशी ओळखायची, याची सविस्तर माहिती मुलांना या उद्यानामध्ये मिळणार आहे. शालेय जीवनातच मुलांना खेळता-खेळता ही माहिती मिळाली तर ती त्यांच्या लक्षात राहील व पुढील जीवनात वाहतुकीचे नियम पाळण्याची शिस्त त्यांच्या अंगी येईल, अशी या ट्रॅफिक पार्कमागची संकल्पना आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी आठवड्यातून एक किंवा दोन दिवस त्यांच्या सोयीनुसार ट्रॅफिक पार्कमध्ये उपस्थित राहतील व ज्यांना शिकाऊ परवाना हवा आहे, त्यांची योग्य ती चाचणी घेतील, अशी सुविधा त्याठिकाणी असणार आहे.

- प्रताप सरनाईक, आमदार

### शिकाऊ परवान्याची व्यवस्था

अठरा वर्षे पूर्ण केलेल्या महाविद्यालयीन तरुण-तरुणींना दुचाकी वाहन चालविण्याचा शिकाऊ परवाना (लर्निंग लायसन्स) याच उद्यानात मिळेल, अशी व्यवस्था करण्यात येणार आहे.

### रविवारी भूमिपूजन होणार

ट्रॅफिक पार्कसाठी मूलभूत सोयी-सुविधा निधी अंतर्गत राज्य सरकारने पाच कोटी रुपयांचा निधी महापालिकेला दिला आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्त मधुकर पांडे, त्यांचे सर्व सहकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत ट्रॅफिक पार्कचे भूमिपूजन १८ जून रोजी करण्यात येणार आहे.